रविवार दि.१६ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८१ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीर

## देहू संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी केली घोषणा

### श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन ३७५ व्या सोहळ्याची वर्षपूर्ती सांगता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन ३७५ व्या बीज सोहळ्याची वर्षपूर्ती अर्थात त्रीशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळ्याचे सांगता आणि ३७६ वा श्री संत तुकाराम महाराज बीज सोहळा रविवारी ( दि. १६ ) देहू नगरीत साजरा होत आहे. या सोहळयाचे दिनी राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्री संत तुकाराम महाराज संस्थान तर्फे श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार प्रदान करीत सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थांचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.श्री संत तुकाराम महाराज मंदिरातील मुख्य कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत यावेळी देहू देवस्थानचे विश्वस्त मानक महाराज मोरे , संजय महाराज मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

देहू देवस्थानचे वतीने यावेळी बीज सोहळ्याचे निमित्त तयारीचा आढावा घेण्यात आला असून राज्यातून येणाऱ्या भाविकांना नागरी सेवा सुविधा देण्यासाठी देवस्थान, देहू नगरपंचायत, महसूल आणि पोलीस प्रशासन यांनी कंबर कसली आहे. भाविकांची बीज सोहळ्याचे काळात नागरी सेवा सुविधांचे बाबतीत कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी देवस्थानचे वतीने संबंधित प्रशासनांस सूचना देण्यात आल्याचे देवस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त माणिक महाराज मोरे यांनी सांगतले. संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन सोहळा बिजोत्सवा त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्ष पूर्ती सोहळ्याची सांगता आणि ३७६ वा बीज सोहळा हरिनाम गजरात येत्या रविवारी ( दि. १६ ) देहूत साजरा होत आहे. या निमित्त होत असलेल्या कार्यक्रमाची माहिती देताना अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे म्हणाले, ३७५ वा बीज सोहळ्यापासून सुरु झालेला त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे माध्यमातून सोहळा साजरा झाला. या सोहळ्याची ३७५ वा वर्षपूर्ती सांगता सोहळा आणि ३७६ वा बीज सोहळा रविवारी देहू नगरीमध्ये प्रथा परंपरांचे पालन करीत भव्य दिव्य प्रमाणात साजरा होत आहे. ३७६ वा बीज सोहळा देहूत मोठ्या प्रमाणात या निमित्त राज्य परिसरातून वारकरी, भाविक, फडकरी आणि संपूर्ण राज्य परिसरात ठीक ठिकाणी झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील प्रमुख मान्यवर या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यामुळे देहूनगरीत मोठी गर्दी होणार आहे. यावर्षीचा ३७६ वा बीज सोहळा रविवारी ( दि. १६ ) असून ३७५ वर्ष पूर्ती श्री संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठ गमन सोहळा वर्षभरातील अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमांचा सांगता मह्या भक्तिमय वातावरणात होणार आहे. या सोहळ्या निमित्त देहूनगरीत येत्या रविवारी ( दि. १६ ) ३७६ वा बीज सोहळा होत असून यात श्री संत तुकाराम महाराज संस्थांचे वतीने राज्याचे माजी मुख्यमंत्री, विद्यमान उपमुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना श्री संत तुकाराम महाराज



पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारात वैभवी पगडी, शाल, उपरणे, वीणा, चिपळ्या, पुष्पहार, तुकाराम महाराज मूर्ती, संत तुकाराम महाराज गाथा, सन्मानपत्र प्रदान केले जाणार असल्याचे श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी सांगितले. मोरे महाराज म्हणाले, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर येथील वारीमध्ये स्वतः दुचाकी वर फिरून वारकरी संप्रदायातील पालखी सोहळ्यातील आलेल्या वारकऱ्यांच्या सेवा सुविधांसाठी पाहणी केली. यात भाविक, वारकरी, दिंडीकरी, विविध ठिकाणाहून आलेले संत पालखी रथ सोहळे यांना पंढरपूर मध्ये विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष परिश्रम पूर्वक नियोजन केले. याशिवाय प्रमुख पालखी सोहळ्यातील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये अनुदान निधी दिला. यासाठी घेतलेला जो ऐतिहासिक निर्णय त्याबद्दल आणि वारकरी संप्रदाय यांचे हितासाठी केलेले कार्याचे कौतुक यातून होत आहे. त्यांनी वारकरी सांप्रदायाची सेवा केल्याबद्दल देहू संस्थान तर्फे वारकरी सांप्रदायात दिलेल्या योगदान बद्दल देहू नगरीत ३७६ व्या बीज सोहळ्यात श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार देऊन विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रदान करीत सन्मानित केले जाणार आहे. या शिवाय त्यांनी निर्मल वारी, हरित वारी साठी विशेष योगदान देत पंढरपूर वारीत वारकऱ्यांना विविध सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या. या त्यांच्या कार्यकार्याचा सन्मान म्हणून हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यापूर्वी देहू संस्थान तर्फे २५ वर्षांपूर्वी माजी मुख्यमंत्री, खासदार, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांना देखील पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते.श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देहू संस्थांचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, सर्व विश्वस्त आणि वारकरी संप्रदायाचे उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे.रविवार ( दि. १६ ) बीज सोहळ्यादिनी श्री क्षेत्र देहूत विविध धार्मिक कार्यक्रम प्रथा परंपरांचे पालन करीत होणार आहेत. यामध्ये पहाटे तीन वाजता काकडा, पहाटे चार वाजता देवस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त मंडळ यांचे हस्ते श्रींची पूजा, शिळा मंदिर महापूजा वंशज देहू / वारकरी यांचे हस्ते होईल. पहाटे सहा वाजता वैकुंठ गमन स्थान येथे पूजा, सकाळी सडे दहा वाजता श्रींची पालखी वैकुंठ गमन स्थान कडे हरिनाम गजरात मार्गस्थ होईल. पहाटे मंदिरात श्री संत तुकाराम महाराज, श्री विठ्ठल रुक्मिणी माता अभिषेक पूजा होत आहे. त्यानंतर श्रींची पालखी मुख्य मंदिरातून सदेह वैकुंठगमन स्थान बीज सोहळ्यास हरिनाम गजरात निघेल. सकाळी दहा ते बारा यावेळेत श्रींचा बीज सोहळा होत आहे. यात हभप देहूकर महाराज मोरे यांचे बीज सोहळ्यावर आधारित कीर्तन सेवा रुजू होईल. दरम्यान बीज सोहळ्याचे कीर्तना पूर्वी श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचे देहू संस्थांचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी सांगितले. आडे बाराचे सुमाराज श्रींची पालखी पुन्हा परतीचा प्रवास करीत मुख्य मंदिरात येईल. रात्री आणि सकाळी पारंपरिक फड आणि दिंड्यांचे कीर्तन कार्यक्रम मुख्य मंदिर, वाकूंठ गमन स्थान आणि जन्मस्थान मंदिर परिसर येथे होणार आहेत. देहू बीज सोहळ्यास सजत असून वारकरी भाविकांचे स्वागताची जय्यद तयारीने देहूत वेग घेतला आहे. दरम्यान सायंकाळी होळीचे पूजन देहू संस्थानचे वतीने परंपरेने झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संत तुकाराम महाराज पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल आळंदी शहर शिवसेना शहर प्रमुख राहुल चव्हाण यांनी देहू देवस्थानचे निर्णयाचे स्वागत करीत आभार व्यक्त केले. पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल एकनाथ शिंदे यांचे आळंदी शहर शिवसेना प्रमुख राहुल चव्हाण, शाखा प्रमुख रोहिदास कदम यांनी अभिनंदन केले.


# कासार सिरसी वनिकरणाला आग आगीत अनेक वृक्ष जळून खाक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कासार शिरशी । फिरोज जागीरदार**

कासार सिरसी येथे सामाजिक वनीकरणाचे दोन हेक्टर क्षेत्रात गठलागवड आहे. या क्षेत्रात सन २०२१ मध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली होती.

मात्र, लागलेल्या आगीमध्ये हजारो वृक्ष खाक झाली आहेत. शासनाचे लाखो रुपये खर्च करून वृक्ष लागवड या कार्यक्रमांतर्गत वृक्षलागवड केली होती. मात्र,लागलेल्या आगीत ती खाक झाली असून, हजारो झाडे–झुडुपे खाक झाल्याने शासनाचे लाखो रुपयांचा नुकसान झाले आहे असे वंचित बहुजन आगाडीचे तालुका अध्यक्ष



स्वप्नील सूर्यवंशी यांनी सांगितले.व सामाजिक वन विभागाचे या कामावर अक्षम्या दुर्लक्षच होतआहे तरी सामाजिक वन विभाने तात्काळ उपाययोजना करण्यात यावे.

# औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी विहिंप व बजरंग दलाचे धरणे आंदोलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण पा.वडजे**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात असलेली औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद (विहिंप) आणि बजरंग दलाच्या वतीने सोमवारी, (ता. १७) सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन औरंगजेबाची कबर त्वरित हटविण्याची मागणी करण्यात येणार आहे.



विहिंप व बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनात सर्व रामभक्त, धर्मप्रेमी नागरिक आणि हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे. औरंगजेबाची कबर हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारी असून ती ऐतिहासिक अन्यायाचे प्रतीक आहे. त्यामुळे ती त्वरित हटवली जावी, अशी सर्वच हिंदुत्ववादी संघटनांची ठाम भूमिका आहे.या आंदोलनाच्या निमित्ताने हिंदू समाजाचा एकसंधतेचा संदेश दिला जाणार असून, धर्माच्या रक्षणासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील, असेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे. यासोबतच, शासन व प्रशासनाने हिंदू समाजाच्या भावना समजून घेत तातडीने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येणार आहे. नांदेड शहर व जिल्ह्यातील सर्व हिंदू समाजाने या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन धर्माच्या रक्षणासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या वतीने गणेश ओमप्रकाश कोकुलवार (वि. हि.प. जिल्हा सह मंत्री) यांनी केले आहे.

# मूकबधिर विद्यालयाची इमारत पाच वर्षांनंतरही अपुर्ण अवस्थेतच बांधकाम पुर्ण होणार केव्हा ?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रायगड । गोविंद जिगळे**

अलिबाग रायगड जिल्हा परिषदेच्या शासकीय मूकबधिर विद्यालयाच्या नव्या इमारतीचे काम मंजूर होऊन पाच वर्षे झाली, तरी अद्याप ठेकेदाराने या इमारतीचे बांधकाम पूर्ण केले नाही. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना खाजगी इमारतीमधून शिक्षणाचे धडे गिरवावे लागत आहेत. इमारत पूर्ण न झाल्याबद्दल जिल्हा परिषदेकडून कोणतीही हालचाल होताना दिसत नाही. काम पूर्ण करण्यासाठी फक्त ठेकेदाराला नोटीस पाठवून आपली जबाबदारी झटकत असल्याचे धोरण जिल्हा परिषदेचे दिसत आहे.रायगड जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाचे शासकीय मूकबधिर विद्यालय आहे. अलिबाग वरसोली येथे या मुलांसाठी विद्यालयाची इमारत होती. ही इमारत जीर्ण झाल्याने त्याच इमारतीमध्ये विद्यालय आणि कार्यालय कार्यरत होते.



**५ वर्षापासून विद्यार्थी खासगी इमारतीत शिक्षण घेत आहेत**

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने राजेश मगर या ठेकेदारास शासकीय मूकबधिर विद्यालयच्या नव्या इमारतीच्या कामाचा आदेश ४ जुलै २०२२ रोजी दिला आहे. २६ लाख ५४ हजार ६०६ रुपये निधी मंजूर असून, ठेकेदाराने सहा महिन्यांत काम पूर्ण करून द्यायचे आहे, असे आदेशात म्हटले आहे. ठेकेदाराने तळमजल्याचे वर्ग खोल्याचे बांधकाम पूर्ण करून द्यायचे होते.१५ ऑगस्ट २०२१ रोजी तत्कालीन पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजनाचा सोहळा पार पडला होता. त्यामुळे लवकरच इमारत बांधकाम पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती. परंतु आता बांधकाम पुर्ण होणार कधी म्हणून विचारले जात आहे.

# बहुजन साहित्य संमेलनामध्ये उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांची प्रमुख उपस्थिती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

अवघ्या काही दिवसांवर बहुजन साहित्य संघ चिखली आयोजित बहुजन साहित्य संमेलन, २०२५ येवून ठेपले असता संघाच्या पदाधिकाऱ्यांची संमेलन यशस्वीते साठी अविरत धावपळ सुरू असून, येत्या ३१ मार्च, २०२५ ला मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील मातोश्री मंगल कार्यालयाच्या सुंदर व रमणीय परिसरामधे संमेलनामध्ये फुले, शाहू, आंबेडकर विचारांचे पाईक, तसेच तळागाळातील व दरीकपारींमधील अतिमागास वर्गाच्या, विकासापासून कोसों दूर जनतेला कल्याणाच्या वाटेवर घेवून येण्याच्या आपल्या कल्याणकारी कामाद्वारे जनसामान्य व्यक्तीच्या मनावर आगळावेगळा ठसा उमटविणारे अधिकारी व्यक्तिमत्त्व अर्थात मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीचे उपविभागीय अधिकारी मा. संजय




खडसे यांची बहुजन साहित्य संघाच्या संमेलनासाठी प्रमुख उपस्थिती लाभणार असून तसे आग्रही निमंत्रण, ब. सा. संघाचे अध्यक्ष ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे, उपाध्यक्ष डॉ. बबनराव महामुने तथा पदाधिकारी व दैनिक लोकनेता चे संपादक आणि इतर मान्यवर यांनी, मां.खडसे साहेब यांना दि. १२–०३–२०२५ रोजी विनंती पूर्वक देऊन उपस्थितीसाठी आवाहन केले व त्यांनी सुध्दा आनंदाने ते स्विकारले.

या वेळी बहुजन साहित्य संघाचे अध्यक्ष ड. डॉ. विजयकुमार कस्तुरे, संघाचे उपाध्यक्ष बबनराव महामूने, संघाचे संयोजक तथा दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत आदी मान्यवर उपस्थित होते.

# शेती करून सन्मानाने जगु इच्छिणाऱ्या एका शेतक-याचे मनोगत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । माधव नागलवाड**

नेमके जगायचे कसं? कोणत्याही बाजूने विचार केला तरी अंधार कोठडी सारखा काळोख दिसून येतो. कारण शेतात उत्पन्न कमी मिळू लागल्याने गाव सोडावं तर शहरामध्ये गर्दीच्या लोंढे ऐवढे वाढले आहेत, त्यात भर नको असे वाटते. गावात राहून शेतीमध्ये कष्ट करावे करावे म्हटले, तर सरकारचे शेतमालाच्या आयात निर्यात धोरण आणि महागाई पोट भरू देत नाही. आजचा दिवस कसाही निघेल पण उद्याच्या दिवसाचे काय?. असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.... तरीही शेतीत मन लावून शेती कसली, उत्पादन वाढवले तर सरकार आश्रयाने व्यापारी आणि उद्योजक लुटायला बसले आहेत. त्यात ग्राहकांना सर्व स्वस्त हवं. किमान शेतीतील गुंतवणुकीचा परतावा मिळतोय की नाही याचा साधा विचार केला जात नसेल शेतकऱ्यांनी करावं काय?... शेतकऱ्यांचे सरकार म्हणून सगळीकडे नारे तर पाहण्यास मिळतात. पण एकही निर्णय शेतकरी केंद्रित का नाही. हा सर्व विचार मनात विचार येण्यामागे.... नुकताच केंद्र सरकारने उडीद डाळीच्या आयात शुल्कमुक्त ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत वाढ दिली आहे. सरकारच्या या पावलामुळे ग्राहकांना डाळींची उपलब्धता वाढण्यास मदत होईल. परंतु डाळींच्या आयातीचा परिणाम देशांतर्गत बाजारपेठेतील किमतींवर होईल. तसेच उडीद या पिकांचे भाव पडतील. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना डाळींचे उत्पादन कसे करायचे आणि डाळींमध्ये स्वयंपूर्णता कशी मिळवायची, हा एक मोठा प्रश्न आहे.

यावरून प्रश्न असा पडल आहे की, नेमके असे कोणते पीक घ्यावे, जे सरकार विदेशातून आयात करत नाही. यास गहू, तांदूळ आणि मशालाच्या पिकांचा अपवाद आहे. पण ही पिके घेण्यास कोरडवाहू परिसर अनुकूल नाही. त्यामुळे कोणतेही पीक घ्यायचे म्हटले आणि घेतले की चार दोन महिन्यात आयात शुल्कमुक्त किंवा कमी करून. किंवा आयात करून शेतकऱ्यांच्या शेतमालाचे भाव पडलेले दिसून येतात.केंद्र सरकारने गेल्या महिन्यात सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात डाळींसाठी सहा वर्षांच्या 'स्व-निर्भरता अभियान'ची घोषणा केली होती. पण दुसरीकडे, डाळींच्या शुल्कमुक्त आयातीचे धोरण सुरूच ठेवण्यात आले आहे. हे दोन्ही टप्पे परस्परविरोधी आहेत. अशा धोरणांमुळे, गेल्या अनेक वर्षांपासून देशातील डाळींचे उत्पादन सुमारे २५०-२६० लाख टनांवर अडकले आहे. कारण स्वस्त आयातीमुळे शेतकऱ्यांना डाळींना योग्य किंमत मिळत नाही. दुसरीकडे, ग्राहकांना स्वस्त आयातीचा पूर्ण फायदा मिळत नाही. ग्राहकांना डाळ जास्त किमतीत खरेदी करावे लागतात.दुसरे, उदाहरण म्हणून कांदा उत्पान घेतला आणि निर्यात करायची म्हटले तर २० टक्के निर्यात शुल्क भरावे लागते. एकूणच इतर कोणत्याही पिकांच्या बाबतीत शेतकऱ्यांनी शेतमाल निर्यात करायचा म्हटले की निर्यात शुल्क भरायचे. मात्र विदेशातून आयात होणाऱ्या शेतमाला आयात शुल्कमुक्त आहे. आयात शुल्क कमी करणे असे धोरण दिसून येते. अर्थात विदेशातील शेतकऱ्यांना मुक्तपणे व्यापारास वावर, मात्र भारतीय शेतकऱ्यांना विदेशात शेतमाल व्यापार करण्यास जास्तीची किंमत मोजावी लागते, वा रे वा....

**-सोमिनाथ घोळवे**

## खेळामुळे करियर निर्माण होते-आ.मोनिकाताई राजळे

# पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे शानदार उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**






महाराष्ट्र शासनातर्फे सध्या खेळांना दिली जाणारी सुविधा आणि प्रोत्साहन यामुळे खेळाच्या क्षेत्रात करिअर निर्माण होत असून अनेक संधी उपलब्ध होत आहेत, असे प्रतिपादन आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांनी केले. चांगली कामगिरी केल्यास शासकीय सेवेत सामावून घेण्यात येते, आणि खेळातून करिअर घडवण्याचा एक उत्तम मार्ग आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून चांगले खेळाडू घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे त्या पुढे म्हणाल्या.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन आणि अहमदनगर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, तसेच शेवगाव स्पोर्ट्स बहुउद्देशीय फाउंडेशन, सत्यभामा प्रतिष्ठान आणि मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे उद्घाटन शेवगाव येथे करण्यात आले.याप्रसंगी खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाचे सहसचिव आणि महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनचे सचिव डॉ. चंद्रजित जाधव, खजिनदार ड . गोविंद शर्मा, पीएमटी शिक्षण संकुलाचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. तसेच नुकत्याच झालेल्या जागतिक खो-खो स्पर्धेत भारतीय संघाचे कर्णधार प्रतीक वाईकर, प्रियांका इंगळे आणि संघांचे प्रतिनिधित्व करणारे सुयश गरगटे, अनिकेत पोटे, रेश्मा राठोड, अश्विनी शिंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आ मोनिकाताई राजळे यावेळी म्हणाल्या, राज्य सरकारने भाई नेरुरकर खो-खो स्पर्धेच्या आयोजनासाठी एक कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे, जे खेळाच्या क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शेवगाव येथे होणाऱ्या राज्य खो-खो स्पर्धेच्या माध्यमातून येथे आणखी उत्कृष्ट खेळाडू तयार होतील.यावेळी डॉ. चंद्रजित जाधव म्हणाले, शेवगाव येथे होत असलेल्या या स्पर्धेची तयारी अवघ्या पंधरा दिवसात केली आहे. चांगले नियोजन केले आहे. या स्पर्धेतून राज्याचा संघ निवडण्यात येणार आहे. हे संघ राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त करतील असा विश्वास देत शेवगावने आतापर्यंत खो-खो, कबड्डीचे सरस खेळाडू महाराष्ट्र आणि देशाला दिले आहेत. याच पद्धतीने भविष्यात चांगले खेळाडू येथून घडतील हे निश्चित आहे. भारतात झालेल्या जागतिक खो-खो स्पर्धेत २४ देश सहभागी झाले होते. या स्पर्धेत भारतीय संघाने सुवर्णपदक मिळवले. यामध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंचा मोलाचा वाटा आहे. या खेळाडूंना केंद्र व राज्य सरकार अडीच कोटी रुपये देणार आहे. सध्या राष्ट्रीय स्पर्धेत काही बदल झाले आहेत. त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. याबाबत आम्ही राष्ट्रीयस्तरावर योग्य ते मत नोंदवले होते. स्पर्धा पाहण्यासाठी अहिल्यानगरसह पंचक्रोशीतील खो - खो रसिक गर्दी करीत आहेत .



नांदेड शहरातील जुनामोंढा येथे रंगपंचमी निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही राधे राधे प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते या फेरीमध्ये विशेष म्हणजे रंगाची उधळण न करता फुलांची उधळण करीत रंगपंचमी साजरी करण्यात येते याप्रसंगी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी उपस्थित राहून सर्वांना रंगपंचमीच्या शुभेच्छा दिल्या.( छाया - बाजीराव पाटील)



धूलिवंदनानिमित्त आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब त्यांच्या बोंढार गावातील बाल गोपाळासोबत मनसोक्त रंगांची उधळण करतेवेळी (छाया - बाजीराव पाटील)

## शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र हरवले आहे

माझे सुर्यवंशी धनराज वामन या नावाचे श्री भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालय येळी ता.उमरगा जि.उस्मानाबाद या शाळेचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र आळंदी देवाची ४ नंबर शाळेजवळ हरवलेले आहे तरी कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा ही विनंती

- संपर्क पत्ता-
सुर्यवंशी धनराज वामन
४ नंबर शाळेजवळ
आळंदी देवाची ता. खेड जि. पुणे
मो नं.८२०८६६४५५६

एम.व्ही.के आणि व्ही.पी.के. उद्योग समूहाला अर्थ सहयोग वाहीनी ऊभी करुन कष्टकरी, शेतकरी आणि तरुणांच्या हाताला काम, खिशात दाम, आणि सन्मान मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्नरत असलेले एक झपाटलेलं व्यक्तीमत्व श्री. मारोतीराव पाटील कवळे गुरुजी व सौ. सागरबाई मारोतराव पाटील कवळे यांचा लग्न वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.( छाया - बाजीराव पाटील)









## हडकोत विविध उपक्रमद्वारे संजय पाटील घोगरे यांचा वाढदिवस साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनील शिंदे**

युवाशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय पाटील घोगरे यांच्या वाढदिवसा निमित्त अनाथ आश्रम,अंध विद्यालय व शासकीय रुग्णालय येथे फळे व मिठाईचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

सिडको - हडकोतील युवा नेतृत्व व सामाजिक कार्यकर्ते तथा युवाशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय पाटील घोगरे यांच्या वाढदिवसा निमित्त १५ मार्च रोजी लहुजी साळवे निराधार निराश्रीत बालकाश्रम साईबाबा नगर वाडीपाटी येथे अनाथ मुलांसाठी मुलांना गर्मीचा त्रास होऊ नये यासाठी कुलर भेट देऊन फळे व मिठाईचे वाटप करण्यात आले. तसेच वसरणी येथील अंध विद्यालय येथेही फळे व मिठाईचे वाटप करण्यात आले. तर शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. यावेळी युवाशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय पाटील घोगरे यांचा वाढदिवस लहुजी साळवे अनाथ आश्रमाती कर्मचाऱ्यांनी अनाथ चिमुकल्यांच्या उपस्थितीत केक कापून वाढदिवस साजरा करून, भावी कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी युवाशक्ती मित्र मंडळाचे गजानन कत्ते, संतोष गुट्टे ,योगेश सोमानी,अनिश घोगरे,प्रताप घोगरे,राज यादव, अनिल मोरे,श्रीनिवास हुसेकर, योगेश हंबर्डे, कैलास हंबर्डे,दत्ता धुमाळ, गणेश भारती, गोपी पुपलवाड, मंगेश कदम,सचिन गादेवार,प्रशांतघोंसीकर, गिरीश डिगोळे, बालाजी डेरलेकर, सचिन चाकूरकर, सतीश ढाकणीकर यांच्यासह कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# दुधाचे ३३९ कोटींचे अनुदान सोमवारपासून होणार जमा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

राज्य सरकारने गायीच्या दुधाला घोषित केलेल्या प्रतिलिटरला पाच रुपये व सात रुपयांप्रमाणे दूध उत्पादक शेतकर्यांच्या देय अनुदानासाठी ३३९ कोटी १५ लाख रुपये दुग्धव्यवसाय विभागाच्या बँक खात्यावर जमा झाले आहेत. त्यामुळे येत्या सोमवारपासून दि.१७/०३/२०२५ रोजी ही अनुदान रक्कम दूध उत्पादक शेतकर्यांच्या बँक खात्यावर ऑनलाइन जमा करण्याची कार्यवाही सुरू होईल, अशी माहिती दुग्धव्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड यांनी दिली.

राज्य सरकारने २९ सप्टेंबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये सहकारी दूध संघ व खासगी दूध प्रकल्पांना दूधपुरवठा करणार्या शेतकर्यांसाठी दूध अनुदान योजना राबविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १ ऑक्टोबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी प्रतिलिटरला सात रुपये अनुदान योजना जाहीर करण्यात आली होती. या योजनेची अंमलबजावणी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि सहकार विभागामार्फत संयुक्तरीत्या होत आहे.

दुधाचे अनुदान देण्याकरिता हिवाळी अधिवेशनात ७५९ कोटींची तरतूद आली होती. त्यापैकी ३३९ .१५ कोटी अनुदान दुग्ध विभागास प्राप्त झाले आहे. त्यानुसार सुरुवातीच्या योजनेतील प्रतिलिटरला पाच रुपये घोषित अनुदान योजनेतील अनुदानाअभावी शिल्लक प्रस्ताव आणि सात रुपये प्रतिलिटर अनुदान योजनेंतर्गतचे प्रस्ताव मिळून हे अनुदान वितरणाची कार्यवाही सोमवारपासून सुरू होणार आहे.

योजनेंतर्गत सुमारे सात ते साडेसात लाख दूध उत्पादक शेतकर्यांना त्याचा लाभ होणार आहे. प्राप्त अनुदान रकमेचा खर्च झाल्यानंतर उर्वरित सुमारे ४२० कोटी अनुदानाची रक्कम राज्य सरकारकडून प्राप्त झाल्यानंतर ही रक्कम वितरित करण्यात येणार असल्याचेही मोहोड यांनी सांगितले.

राज्य सरकारने दुधासाठी राबविलेल्या योजनेतील थकीत अनुदान देण्याची एकमुखी मागणी १२ मार्चला झालेल्या सहकारी व खासगी दूध डेअर्यांच्या प्रतिनिधींनी कल्याणकारी संघाच्या बैठकीत केली होती. त्यावर तत्काळ निर्णय होऊन थकीत अनुदानापैकी ३३९ कोटी रुपये अनुदान देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. राज्यात गायीच्या दुधासाठी प्रतिलिटरला पाच रुपये अनुदान योजना कायमस्वरूपी राबविण्याची आमची मागणी आहे.



# मुख्याध्यापक मंजुर अहमद परदेसी सेवानिवृत्त!

## संस्थेचे सचिव मा.आ.कुरूडे यांनी सत्कार करून दिला कार्यमुक्तीचा आदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्या हताईपुरा येथील मगदुमिया उर्दू प्रा.शाळेचे मुख्याध्यापक मंजुर अहमद अब्दुल रज्ज़ाक परदेसी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सोसायटीचे सचिव माजी आमदार गुरुनाथराव कुरुडे यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करून त्यांना कार्यमुक्तीचा आदेश देण्यात आला. परदेसी सरांची एकूण सेवा ३४ वर्ष ७ महिने एवढी झाली आहे.

दि. १/८/१९९० रोजी परदेसी गुरुजींची मगदुमिया प्रा. शाळेत सर्वप्रथम सह शिक्षक म्हणून नियुक्ती झाली. अध्यापन बरोबरच त्यांना डमिनिस्ट्रेशनाबाबत माहिती असल्याने संस्थेने त्यांच्यावर मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सोपवली. १९९५ पासून सेवानिवृत्ती पर्यंत म्हणजेच २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत त्यांनी मुख्याध्यापकाची जबाबदारी अत्यंत चोखपणे बजावली. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी कार्यालयात त्यांच्या शब्दाला मान होता. यामुळे शाळेची कोणतीही कामे प्राधान्य क्रमाने होत असे. दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी संस्थेचे सचिव माजी आमदार गुरुनाथराव कुरूडे यांच्या कार्यालयात सेवानिवृत्ती बद्दल त्यांचा शाल व पुष्पहार देऊन छोटेखानी सत्कार करण्यात आला. यावेळी गुरुनाथराव कुरूडे यांच्यासह गंगामाता प्रा.शाळेचे मुख्याध्यापक हाजी महोम्मद अन्सारोदीन,ड. हफीज घडीवाला, बबुखा पठाण, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक लईखोद्दीन सरवरी,म.मगदूम परदेसी, हसीब परदेसी,निमरान परदेसी, निलेश गायकवाड,मुजम्मिल परदेसी,उवैस परदेसी आदी उपस्थित होते.

# गुलाबराजा फुलमाळी यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुकनायक पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । प्रतिनिधी**

विश्वबंधुता साहित्य परिषद पुणे यांच्या वतीने दिला जाणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुकनायक पुरस्कारासाठी सुप्रसिद्ध कवी, गीतकार, दै. महाराष्ट्र दर्पण चे संपादक गुलाबराजा फुलमाळी यांची निवड झाली आहे. कवी गुलाबराजा फुलमाळी यांनी महाराष्ट्र दर्पण वृत्तपत्राच्या माध्यमातून अनेक ग्रामीण भागातील कवी, लेखकांच्या साहित्यिकांना प्रसिद्धी दिली आहे. तळागातील अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी निर्भीड अशी भूमिका व निस्वार्थपणे करत असलेल्या कार्याची दखल घेऊन विश्वबंधुता साहित्य परिषदेने पुरस्कारासाठी निवड केल्याचे संस्थापक अध्यक्ष बंधूताचार्य प्रकाशजी रोकडे यांनी निवड पत्र देताना सांगितले. गुलाबराजा फुलमाळी यांचा प्रवास अतिशय खडतर परिस्थितीतून झालेला असून भटक्या समाजातून असूनही स्वतःचीं वेगळी ओळख निर्माण केली आहे. अनाथ अपंग गरजवंताना मदत करणाऱ्या राजेश्री शिवशाही समुह संस्थेचे ते सचिव म्हणून कार्य करतात. अनेक समजपयोगी उपक्रम राबविण्यात त्यांचा पुढाकार असतो. फुलमाळी लवकरच मोठ्या पडद्यावर दिसणार असून नुकतेच दोन मोठया चित्रपटाचे चित्रकरण पूर्ण झाले आहे. जेष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या सोबत मुख्य पुजारी तर अभिनेते जितेंद्र जोशी यांच्या सोबत कुस्तीपटू पंच अशी भूमिका केली आहे. अनेक ठिकाणी व्याख्यानाच्या माध्यमातून अनेक युवा पिढीला दिशा देण्याचे कार्य सुरु असते.. तुझ्या कुंकवात माय मले पंढरी दिसते, गोष्ट अशी कीं.. या गाजलेल्या रचनामधून रसिकमनावर भुरळ पाडतात अशा वास्तव विषयावर परखड भाष्य करणे फुलमाळी यांची विशेष ओळख आहे.



विश्वबंधूता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, काषाय प्रकाशन या संस्थाच्या वतीने दि. १२ एप्रिल २०२५ रोजी एस. एम. जोशी सभागृह, नवी पेठ पुणे येथे जेष्ठ साहित्यिक प्रा.सुभाष वारे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या विश्वबंधुता साहित्य संमेलनात पुरस्काराचे वितरण सकाळी १० वाजता होणार आहे.केसरी, लोकमत, टीव्ही ९,महाराष्ट्र टाइम्स, सकाळ अशा नामवंत वृत्तपत्राच्या प्रतिनिधी व संपादकांना गौरविण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी प्राध्यापक सुभाष वारे मा.कृष्णकुमार गोयल,डॉ. अश्विनी घोंगडे, बंधुताचार्य प्रकाश रोकडे, डॉ. विजय ताम्हाणे, प्रा. चंद्रकांतदादा वानखेडे,डॉ.अरुण आंधळे,डॉ अशोक कुमार पगारिया, प्रा. शंकर आथरे आदी मान्यवरांच्या व राज्यभरातील लेखक, कवी, विचारवंतांच्या उपस्थितीत सोहळा पार पडणार आहे.

# सहाय्यक अभियंता पदी पल्लवी सोंडारे यांची निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

पल्लवी सोंडारे हिची महापारेषण महावितरण विभागात सहाय्यक अभियंता पदी निवड झाली आहे. पल्लवी ही बिलोली तालुक्यातील बोरगाव थडी येथील गरीब कुटुंबातील मुलगी आहे. अथक प्रयत्नातून तीने हे यश मिळवले आहे. या यशाबद्दल माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी पल्लवीचा सत्कार करत शुभेच्छा दिल्या. यावेळी पल्लवी हिने आभार मानले यावेळी माधव वाघमारे, अशोकराव सोंडारे, लक्ष्मण सोंडारे, माधव नालापल्ले कैलास पाटील, बळवंत पाटील, वैजनाथ सोनकांबळे,गौतम सोनकांबळे, दिपक कांबळे,अनील सोंडारे, अमोल सोंडारे,राहुल सोंडारे, कपिल सोंडारे सुजित सोंडारे, सुशील सोंडारे मुन्ना सोंडारे प्रणिता सोंडारे,संदीप सोनकांबळे केरूरकर आदी उपस्थित होते.

# वडगांवशेरी मध्ये रंगला आदेश बांदेकर यांचा खेळ मांडियाला कार्यक्रम

## संकेत गलांडे यांच्या तर्फे आयोजन,हजारो महिलांची उपस्थिती!





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रम म्हणजे आनंदाची पर्वणीच.जागतिक महिला दिन निमित महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी कांग्रेस चे संकेत गलांडे यांच्या तर्फे महाराष्ट्राचे लाडके भाऊजी आदेश बांदेकर यांचा खेळ मांडियाला होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमा साठी हजारोहून अधिक महिला उपस्थित होते. आदेश बांदेकर यांनी विविध स्पर्धा घेऊन महिला सोबत संवाद साधला. महिलांनी मनमुराद हसून आनंद घेतला.

स्पर्धे मध्ये प्रथम क्रमांक सौ मनीषा कोहिनकर यांनी पटकावला अष्टेकर ज्वेलर्स तर्फे सोन्याची नथ व कलाशेत्रम तर्फे मानाची पैठणी तसेच दुसरा क्रमांक सौ रविना कांबळे यांना अष्टेकर ज्वेलर्स तर्फे चांदी चा छला व कलाशेत्रम पैठणी व तिसरा क्रमांक सौ मयुरी संदीप वीर यांना अष्टेकर ज्वेलर्स तर्फे चांदीचे भेट वस्तू व कलाशेत्रम पैठणी देऊन गौरविण्यात आले.यावेळी विविध क्षेत्रातील महिलांना आदर्श महिला पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये श्रीमती ठाकूबाई उकिरडे (आदर्श माता) किरण तावरे मॅडम ( शिक्षण) डॉ भारती ढोरेपाटील ( वैद्यकीय) सौ रतन थोरात ( व्यवसायिक) कु काव्य हारगुडे ( क्रीडा) यांना आमदार बापूसाहेब पठारे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी येथे सुरेंद्र पठारे,दिलीप देवकर ,अतुल अष्टेकर ,प्रथमेश गाडवे, देविदास निकाळजे, प्रतीक उकिरडे, श्रीरंग लंघे ,राजेश देवकर, विनोद गलांडे, गीता साळुंखे, चांगुलपाई मॅडम आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन सुप्रिया म्हस्के यांनी केले.

# ॲड.दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून आयोजित केलेल्या २५ व्या महामुर्ख कविसंमेलनात हजारो रसिकांनी होळीचा लुटला मनसोक्त आनंद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**






शृंगारीक कविता आणि दिव्यार्थी विनोदाची रेलचेल असलेले महामुर्ख कविसंमेलन होलिका उत्सव समिती व लायन्स क्लब नांदेड सेंट्रल द्वारे होळीनिमित्त सतत २५ व्या वर्षी नवा मोंढा नांदेड येथे महामूर्ख कविसंमेलनाचे आयोजन दिलीप ठाकूर यांच्यासह डॉ.जुगल धुत, पंढरीनाथ बोकारे, सुरेश लोट हे करतात. रसिकांनी खचाखच भरलेल्या मैदानात सुरुवातीला मूर्ख शिरोमणी म्हणून मान्यता पावलेल्या दोन गर्दभ राजाचे माजी विरोधी पक्ष नेते दीपकसिंह रावत आणि प्रसिद्ध उद्योजक सतीश सुगनचंद शर्मा यांनी पुष्पहार घालून स्वागत केले. भाजपा उपाध्यक्ष व्यंकटेश जिंदम यांनी एका तृतीय पंथीयाला विशिष्ट प्रकारचा हार घातल्या मुळे हास्याचा स्फ़ोट झाला. प्रसिद्ध व्यापारी आनंद साताळे,गुरुद्वारा बोर्ड सचिव रविंद्रसिंघ बुंगई,प्रतिष्ठित व्यापारी संजय बोधणे, भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड.किशोर देशमुख,भाजप उद्योग आघाडी उपाध्यक्ष शिवप्रसाद राठी,डॉ. उमेश भालेराव,डॉ. सुशील राठी, अल्पबचत संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन शिवलाड, प्रसिद्ध उद्योजक सेवकसिंघ जहागीरदार, नांदेड भूषण राजेंद्र हुरणे,प्रतिष्ठित व्यापारी शिवाजीराव इबितवार,प्रतिष्ठित व्यापारी नागेश शेट्टी, सामाजिक कार्यकर्ते संदीप अग्रवाल,प्रतिष्ठित व्यापारी सुमेर राजपुरोहित यांची प्रमुख उपस्थिती होती.वाराणसी नंतर फक्त नांदेडमध्येच होळीच्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात येते.आगळ्यावेगळ्या या कविसंमेलनात हास्यसम्राट सिध्दार्थ खिल्लारे यांच्या उडत्या चालीवर असलेल्या विडंबन गितांना रसिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला.अनिल आवारा बनारस यांच्या आगळ्या वेगळ्या शैलीमुळे कविसंमेलनाची रंगत वाढली.मुंबईच्या विनोद सोनी आणि बालाघाट मध्यप्रदेशचे लक्ष्मीचंद ठाकूर यांनी शृंगार गीते सादर केली. उत्तर प्रदेश च्या सफर जौनपुरी यांच्या हजर जबाबी पणाला रसिकांनी दाद दिली.प्रा.रविंद्र अंबेकर यांचे विनोदी किस्से ऐकून श्रोते मंत्रमुग्ध झाले.सिनेस्टार लच्छु देशमुख यांनी सहअभिनय सादर केलेल्या विनोदामुळे उपस्थिताची चांगली करमणूक झाली.वसंतराव इंगोले यवतमाळ यांनी देखील आपल्या रचनांनी रसिकांवर छाप पाडली. संयोजक दिलीप ठाकूर यांनी संचलन करतांना प्रत्येक अतिथी व कवी यांच्यावर केलेल्या विनोदी टिपणीना हजारो श्रोत्यांनी वेळोवेळी मनमुराद टाळ्या वाजवून पसंती दर्शविली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्बंधामुळे नाईलाजास्तव रात्री दहा वाजता कार्यक्रम बंद करण्यात आला तरी रसिकांचा वर्षभरातील हसण्याचा कोटा पूर्ण झाला.मैदानाची जागा अपुरी पडल्यामुळे उशिरा आलेल्या रसिकांना चार तास उभे राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा लागला.नरेश निहलानी, राजू लालवानी, जुगलकिशोर शुक्ल यांनी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती.मनपा तर्फे वसीम तडवी, स्वच्छता निरीक्षक सतीश नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मैदानाची स्वच्छता करण्यात आली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शिवाजी नगर पोलीस स्टेशन तर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दररोजच्या व्यस्त दिनचर्येतून सवड काढून अनेक माध्यम प्रतिनिधींनी या कविसंमेलनाचा मनसोक्त आनंद लुटला. विपिन कासलीवाल, हरिभाऊ मालपानी, कैलाश राठी, पप्पू रिजवानी व्यंकट मोकले, बागड्या यादव, संदीप छापरवाल, कैलास ठाकूर, अनिल जगताप यांच्या सह अनेकांनी महामूर्ख कविसंमेलनाची रजत जयंती पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदन केले.महामूर्ख कविसंमेलन यशस्वी करण्यासाठी राजेशसिंह ठाकूर,कामाजी सरोदे, सुरेश शर्मा, अरुणकुमार काबरा, सुरेश निलावार,प्रभुदास वाडेकर,जगतसिंह ठाकूर, शिवा लोट, विकास वाठोरे, प्रकाश उंटवाले,अजयसिंह परमार,धरमसिंह परदेशी, विलास जोगदंड, संतोष भारती,गौतम सावने,राहुल साउंडवाले, शिवकुमार लोट, कपिल यादव,गणेश बिरकुरे यांनी परिश्रम घेतले.वर्षभर मनातील एका कोपऱ्यात साचलेल्या भावनांचा निचरा करण्यासाठी दिलीप ठाकूर हे गेल्या २५ वर्षापासून होळीचे अनोखे आयोजन करत असल्यामुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# बजरंग दलाचे शौर्य पथसंचलन आणि धर्मसभा उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**






विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने आयोजित शौर्य पथसंचलन व धर्मसभा रविवारी (ता. १२) नांदेड शहरात मोठ्या उत्साहात पार पडली. या कार्यक्रमात दीड हजारांहून अधिक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. पथसंचलनाद्वारे राष्ट्रसेवा, शौर्य आणि धर्मभावनेचा जागर करण्यात आला, तर धर्मसभेत तरुणांना राष्ट्रसेवेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

पथसंचलनाची सुरुवात गाडीपुरा येथील हनुमान मंदिरातून दुपारी २ वाजता झाली. संचलन जुना मोंढा ते अशोकनगरातील हनुमान मंदिर येथे समारोपास पोहोचले. मार्गावर स्वयंसेवकांनी राष्ट्रसेवेची शपथ घेतली व विविध ठिकाणी स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. सायंकाळी पाच वाजता अशोकनगर हनुमान मंदिरात धर्मसभा झाली. या सभेत विहिंप क्षेत्र मंत्री गोविंदजी शेंडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी धर्म आणि संस्कृतीच्या संवर्धनाची गरज व्यक्त केली व तरुणांनी आपल्या जीवनात शौर्य व संस्कार यांचा समावेश करावा, असे आवाहन केले. सभेत स्वामी वेंकटेशाचार्य (जियर स्वामी संस्थान, श्री बालाजी मंदिर, गाडीपुरा) आणि डॉ. ष. ब्र. १०८ शिवाचार्य वीरूपाक्ष महाराज (मुखेड) यांनीही संतवाणीच्या माध्यमातून उपस्थितांना प्रेरित केले. त्यांनी धर्मभावना जागवण्यासह सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्यावर भर दिला. या कार्यक्रमात विवेकजी (बजरंग दल क्षेत्र संयोजक, जामखेड) आणि कृष्णाजी देशमुख (विहिंप प्रांत सदस्य) यांनीही आपले विचार मांडले. त्यांच्या व्याख्यानातून सेवा, सुरक्षा आणि संस्कार या तत्त्वांचे महत्त्व विशद झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाद्वारे तरुणांना राष्ट्रभक्तीची नवी ऊर्जा मिळाली, तसेच हिंदू संस्कृतीच्या जतनासाठी नवा दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाला तरुण स्वयंसेवकांसह स्थानिक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. शिस्तबद्ध संचलन आणि प्रभावी भाषणांनी कार्यक्रमाचा उत्साह वाढवला. या पथसंचलनाद्वारे राष्ट्रसेवा, सामाजिक एकता आणि धर्मभावनेचा जागर यशस्वीपणे साध्य झाला.



दैनिक लोकनेता पेपर चे नरसी ता नायगाव येथील पत्रकार सय्यद चांदपाशा नरसीकर यांच्या सय्यद शाहेस्ता चांदपाशा वय वर्ष ७ व सय्यद आहाना चांदपाशा वयं वर्षे ८ या दोन्ही मुलींनी रमजान महिन्याचा रोजा चा उपवास ठेवून आदर्श निर्माण केला आहे त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.(न्युज नेटवर्क नरसी)

# खासगी संस्थेला मिडीया मॉनिटरिंग देण्याच्या सरकारच्या निर्णयाला तिव्र विरोध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**



राज्य सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतल्याने तसेच हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा असल्याचे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे यांनी अहिल्यानगर येथे बोलताना व्यक्त केले.

याबाबत पारनेर तहसील कार्यालय व अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयामधे पत्रकारांसह जात त्यांना या संदर्भातील निवेदन देण्यात आले.


पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे. मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्यामुळे बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर आपला अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई,अहिल्यानगर जिल्ह्याचे वतीने सरकारच्या या निर्णयाला तीव्र विरोध करत असल्याचे सांगीतले.सदर निवेदनामधे, सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून लादली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे घेण्यासंदर्भात आम्ही शासनास पत्राद्वारे कळवले होते. मात्र, आमच्या मागण्यांची दखल न घेतल्याने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई तर्फे राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन व निदर्शने करण्याचे ठरवले असून आपणास या निवेदनाद्वारे पुन्हा एकदा आमच्या मागण्या सरकार दरबारी ठेवण्यास अवगत करत आहोत.पुढील ८ दिवसांत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास आम्ही मंत्रालयाबाहेर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलने करु असा इशारा देत आहोत. सदर बाब पुरोगामी महाराष्ट्रात घडू नये असे आम्हाला वाटते यासाठी आमच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करुन राज्य शासनाने खाजगी संस्थेमार्फत मीडिया मॉनिटरिंग करण्याचा घेतलेला निर्णय तत्काळ मागे घ्यावा अशी विनंती आहे अशा आशयाचे निवेदन देण्यात राज्यभरातील जिल्हाधिकारी,तहसिल कचेरीवर तसेच सरकारी कार्यालयांमधे देण्यात आले आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहील्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे,उपाध्यक्ष विनोद गायकवाड,तालुका सचिव संतोष कोरडे,सह सचिव अ‍ॅड्.सोमनाथ गोपाळे,उपाध्यक्ष वसंत रांधवण,उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे,तालुका खजिनदार नितीन परंडवाल,इलेक्ट्रॉनिक्स मिडीया प्रमुख महेश शिंगोटे आदींसह पत्रकार बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

# सोमवारी भगवानगड दिंडीचे होणार पैठणकडे प्रस्थान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भगवानगड । प्रतिनिधी**






शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक साधुसंतांच्या दिंड्या पैठणला जातात. श्री क्षेत्र भगवानगड संस्थानची सुद्धा दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नाथांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दिंडी पैठणला जाणार आहे. या सोहळ्याला 'नाथषष्ठी' असे म्हणतात. या सोहळ्यासाठी भगवानगडाचे सर्व भक्त गडावर येऊन सोमवार दि.१७ मार्च रोजी दुपारी ठीक १ वाजता ह.भ.प.श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली दिंडी सोबत पैठणकडे प्रस्थान करणार आहेत. या दिंडी सोहळ्याचा पहिला मुक्काम राणेगावमध्ये, दुसरा मुक्काम प्रभूवाडगावमध्ये असून तिसऱ्या मुक्कामी दिंडी पैठणमध्ये पोहोचते. दिंडी सोहळ्या दरम्यान भगवानगडावरील युवा कीर्तनकार, सर्व साधकवर्ग व गडाचा संपूर्ण भक्तवर्ग मोठ्या आनंदामध्ये 'भानुदास एकनाथ' नामाचा गजर करत मार्गक्रमण करतो. वारीमध्ये चालताना पहाटे काकडा भजन, आंधळा, पांगळा, वासुदेव, गौळणी इत्यादी होतात. त्यानंतर दुपारचे अभंग गायले जातात. यामध्ये समाधीचे अभंग, पत्रिकेचे अभंग इत्यादींचा समावेश असतो. सायंकाळी ४ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ व शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचा हरिपाठ होतो. हरिपाठानंतर सर्व वारकर्यांना नियोजित ग्रामस्थांतर्फे जेवणाची पंगत दिली जाते. रात्री ८ ते १० या वेळेमध्ये कीर्तनाचा कार्यक्रम असतो. कीर्तनानंतर जागर केला जातो. दिंडी पैठणमध्ये पोहोचल्यानंतर नाथवंशज दरवर्षी भगवानगडाच्या फडामध्ये येऊन भगवानगडाच्या दिंडीला नाथषष्ठी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण देतात. श्री क्षेत्र भगवानगडाच्या फडामध्ये नाथांच्या समाधी सोहळ्याचा काला होईपर्यंत दररोज पहाटे काकडा भजन, दुपारचे भजन, दोन्ही हरिपाठ, हरिकीर्तन, हरीजागर इत्यादी सर्व धार्मिक नित्यनियम पार पाडले जातात.

# बंजारा समाजाच्या वतीने पारंपारिक होळी मोठ्या उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**




कंधार तालुक्यामध्ये बंजारा समाजाच्या तांड्याची संख्या मोठ्या प्रमाणात असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कंधार तालुक्यातील बहुतांशी तांडा वर पारंपारिक होळी उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. होळी सणाची वाट बंजारा समाज आतुरतेने बघत असतो बंजारा समाजाची होळी पंधरा दिवसांपासून सुरू झालेली असते बंजारा समाजातील नायक कारभारी डायसाने यांच्या उपस्थितीमध्ये पारंपारिक गीत लेंगी, या गीताच्या तालावर नृत्य करत संत सेवालाल महाराजांनी दाखवलेल्या मार्गावर हा समाज चालत असतो वर्षातून एकदा येणारा होळी सण सर्व तांड्यावर थाटात साजरा केला जातो, होळीच्या दिवशी होळी पेटून महिला पुरुष तरुण वर्ग होळीच्या सभोवताली संत सेवालाल महाराज विविध देवतेची आराधना करत गीत गायले जातात दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाच्या दिवशी धुंड साजरा केला जातो कंधार तालुक्यातील ढाकू तांडा खेमा तांडा, भोजू तांडा, पांगरा तांडा,काशीराम तांडा, हिरामण तांडा,गणा तांडा यासह अनेक तांड्यावर पारंपारिक पद्धतीने होळी सण साजरा आले, तालुक्यातील पानशेवडी येथील संत मिठु भुकीया महाराज गडावर या वर्षी मोठ्या थाटात होळी साजरी केली, या होळी उत्सवाचे आयोजन भाजपा उपजिल्हा अध्यक्ष भगवान राठोड यांनी केले होते या वेळी अनेक तांडयाचें नायक कारभारी, श्रीराम जाधव, सुधाकर राठोड, रमेश जाधव संतोष राठोड अंकुश पवार परमेश्वर पवार प्रल्हाद पवार जेष्ठ नायक किशन नायक राठोड यांच्यासह रामा तांडा खेमा तांडा भोजू तांडा गणपुर तांडा किसन तांडा परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने संत मिठु भिकिया महाराज गडावर उपस्थित होते,

# मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्पासाठी ९० कोटी रुपये निधी मंजूर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । प्रतिनिधी**



मुखेड,लेंडी प्रकल्पासाठी ९० कोटी रुपये निधी गोदावरी महामंडळास वितरीत झाला आहे. या निधीतून शेतकऱ्यांना प्राधान्याने सानुग्रह अनुदान वाटप व या प्रकल्पाच्या घळभरणीचे काम समांतरपणे त्वरीत सुरु करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.लेंडी आंतरराज्य प्रधान प्रकल्प हा महाराष्ट्र व तेलंगना राज्याचा संयुक्त प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा पाणी वापर क्षमता ५. ९६ टीएमसी इतका आहे. या प्रकल्पामुळे एकूण २६ हजार ९२४ हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पास १९८५ मध्ये प्रशासकीय मान्यताप्राप्त असून प्रकल्पाची अद्यावत किंमत २ हजार १८४ कोटी रुपये इतकी आहे. प्रकल्पग्रस्तांनी सन २०११ पासून विविध मागण्यासाठी प्रकल्पाचे काम बंद केले होते.यात प्रमुख मागण्यापैकी मुक्रमाबाद पूर्ण गावाचे स्वच्छ पुनर्वसन करणे, ज्या गावांमध्ये शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे वितरण व प्रकल्पाच्या घळभरणी काम करण्याचे जलसंपदा मंत्र्याचे निर्देशपूर्णतः जमीन उपलब्ध होत नाही, तेथील प्रकल्पग्रस्त कुटूंबाना स्वेच्छा पुनर्वसन अनुदान देणे. वंशवृध्दीमुळे प्रकल्पग्रस्त कुटूंबामध्ये वाढ झाल्यामुळे वाढीव कुटूंबाना विशेष आर्थिक अनुदान देणे. शेतकऱ्यांसाठी विशेष बाब म्हणून सानुग्रह अनुदान मंजूर करणे, वरील तिन्ही मागण्या मान्य झाल्या असून शासन निर्णय निर्गमित झाला आहे. याबाबत एकूण २२१ कोटी रुपयाचा निधी महसूल विभागाकडे वर्ग करुन प्रकल्पग्रस्तांना वाटप करुन यावर्षी धरणाचे काम पुनश्च सुरु करण्यात आले होते. सानुग्रह अनुदानाच्या मागण्यासाठी नियामक मंडळाने २७ सप्टेंबर २०२४ रोजी १६५.११ कोटीस मंजुरी दिली.घळभरणीसाठी तांत्रिक व प्रशासकीय दोन्ही मान्यता प्राप्त करण्यात आलेल्या होत्या. परंतु प्रकल्पग्रस्तांनी ५ फेब्रुवारी २०२५ पासून घळभरणीचे व इतर कामे पुन्हा बंद केली होती. आता इतर कामे पुन्हा सुरु करण्यात येत असून त्या अनुषंगाने ११ मार्च २०२५ रोजी जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता अधीक्षक यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. या अनुषंगाने लेंडी प्रकल्पास ९० कोटी रुपये निधी गोदावरी महामंडळास वितरीत करण्यात आला आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904